MHCO110001662023

सादर दिनांक : १७.०६.२०२३
नोंदणी दिनांक : १७.०६.२०२३
निकाल दिनांक : ०५.०८.२०२६
कालावधी : वर्ष महिने दिवस
०३ ०१ १९

न्यायाधीश, सहकार न्यायालय सातारा यांचे न्यायालयात

पिठासीन अधिकारी श्रीम. स्वप्नाली मेथाजी वाघमारे

सहकार दावा : १६६/२०२३
निशाणी :

चैतन्य नागरी सहकारी पतसंस्था
मर्या. फलटण ता. फलटण
जि. सातारा.

विरुध्द

१. गितांजली एंटरप्रायजेस तर्फे
प्रोप्रा. जयेंद्र विठ्ठल जाधव
वय—४६ धंदा—दुग्ध व्यवसाय
रा. बृहन्मुंबई दुध वितरण केंद्र
वेदांत हॉस्पिटल शेजारी

अलंकार ज्वेलर्स शेजारी, घाटकोपरमुंबई.

२. श्री. अमित ज्ञानेश्वर धोंगडे

वय—४० धंदा—दुग्ध व्यवसाय

रा. कोळकी ता.फलटण

जि. सातारा.

३. श्री. इंद्रराज किसन मोरे

वय—४२ धंदा—खाजगी नोकरी

रा. व्यंकटेश अॅग्रो प्रोसेसिंग कंपनी

कोळकी, ता.फलटण जि. सातारा.

दावा कर्ज रक्कम रु. १०,१६,७५०/—

....

वादी तर्फे अॅड. एस. एम. भोंगळे

प्रतिवादी क्र. १ कैफियत

प्रतिवादी क्र. २ व ३ एकतर्फा

....

न्यायनिर्णय

(**दिनांक — ०५.०८.२०२६**)

१. प्रस्तुत वादी यांनी प्रतिवादी म्हणजेच कर्जदार व जामीनदार यांचेकडून थकीत कर्ज रक्कम व्याजासह वसुल होणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

२. **वादीचे दाव्यातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे ...**

वादी संस्था ही महाराष्ट्र सहकार कायदा १९६० नुसार नोंदणीकृत झालेली संस्था आहे. सदर पतसंस्थेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून श्री. दिपक चंद्रकांत निंबाळकर यांना पत संस्थेचे वतीने कर्ज संबंधी कामकाज पाहणेसाठी अधिकारपत्र देणेत आलेले आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी वादी संस्थेकडे रक्कम रु. ५,००,०००/— ची कर्ज मागणी केली होती. प्रतिवादी क्र. १ यांची अडचण लक्षात घेता वादी पतसंस्थेने त्यांना दिनांक २०.१०.२०१२ रोजी रक्कम रु. ५,००,०००/— चे कर्ज द.सा.द.शे १५ टक्के दराने मंजूर केले होते. सदर कर्जास प्रतिवादी क्र. २ व ३ जामीनदार राहिले असून ते कर्जाचे परतफेडीकरिता वैयक्तिक व सामुदायिकरित्या जबाबदार असलेचे त्यांनी लिहून दिले.

३. प्रतिवादी क्र. १ कर्जदार तसेच प्रतिवादी २ व ३ हे जामीनदार यांनी करारनाम्याप्रमाणे व कर्जासंबंधीच्या अटी शर्तीनुसार दिलेल्या कर्जाची परतफेड केली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांचे कर्ज थकीत राहिले आहे. दिनांक १८.०३.२०२३ अखेर कर्ज खाते उतार्‍यानुसार व्याजासहित व इतर खर्चासहित प्रतिवादी यांचेकडून कर्ज रक्कम रु. १०,१६,७५०/— व सदर रक्कमेवर १५ टक्के प्रमाणे व्याजासह होणारी एकूण कर्ज रक्कम प्रतिवादी हे वादी पतसंस्थेस देणे लागतात. दिनांक ०४. ०१.२०२३ रोजी वादी यांनी विधिज्ञांमार्फत प्रतिवादी यांना रक्कम मागणे नोटीस पाठवून थकीत कर्जाची मागणी केली. परंतु सदर नोटीस मिळून देखील प्रतिवादी यांनी थकीत कर्जाची परतफेड केलेली नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा वादी पतसंस्थेने प्रतिवादी यांचेकडून थकीत कर्ज रक्कम व्याजासह वसूल होउन मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

४.   प्रतिवादी क्र. २ व ३ यांना समन्सची बजावणी करणेत आली. प्रतिवादी क्र. २ हे दाव्यात हजर झाले नाहीत. त्यामुळे दि. २५.०७.२०२४ रोजी त्यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालावा असा आदेश पारित करणेत आला.

५.   प्रतिवादी क्र. १ यांनी निशाणी १९ कडे त्यांची कैफियत दाखल केली आहे. सदर प्रतिवादी यांनी त्यांचे कैफियतीमधून दाव्यातील कर्जप्रकरण मान्य केले आहे. परंतु प्रतिवादी क्र. १ हे कथन करतात की, वादी यांनी दाव्यात नमूद केलेला मजकूर खोटा व लबाडीचा आहे. प्रतिवादी यांनी दाव्यातील कर्ज नाकारले असून दाव्यात दाखल केलेले सर्व कागदपत्रे बनावट असल्याचे कथन केलेले आहे. सदर प्रतिवादी कथन करतात की, त्यांनी वादी यांचेकडून कर्ज घेतले नसून प्रतिवादी क. २ व ३ हे सदर कर्जास जामीनदार नाहीत. तसेच वादी यांनी पाठवलेली कर्जमागणी नोटीस मिळाली नसल्याचे कथन प्रतिवादी यांनी केलेले आहे. प्रतिवादी पुढे कथन करतात की, वादी यांनी दाखल केलेला खातेउतारा चुकीचा व बनावट आहे. परंतु सदर प्रतिवादी पुढे वैकल्पिक कथन करतात की, त्यांना कर्जाची पूर्ण परतफेड केलेली आहे व शेअर्सची रक्कम व अनामत रक्कम कर्ज खात्यात भरुन कर्ज प्रकरण बंद केलेले आहे. अशाप्रकारे प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांचा दावा फेटाळण्याची विनंती केलेली आहे.

६.   दाव्याचा अभिलेख पाहिला. दोन्हीही पक्षकार यांचे विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले. अभिलेखावरील उपलब्ध वाद कथनावरुन माझे माननीय पुर्वाधिकारी यांनी नि. २१ कडे खालील मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे—

अ. क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१	प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांचेकडून दि. २०.१०.२०१२ रोजी रक्कम रु. ५,००,०००/— चे कर्ज प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे जामिनकीवर घेतलेचे व कर्जासंबंधीची कागदपत्रे तयार केल्याचे शाबित करतात काय?	होकारार्थी
२	प्रतिवादी यांनी कर्ज फेडीमध्ये कसूर केलेचे वादी शाबित करतात काय?	होकारार्थी
३	प्रतिवादी यांनी पूर्ण कर्जरक्कमेची परतफेड केल्याचे तसेच शेअर्सची रक्कम भरुन कर्जखाते बंद केल्याचे शाबित करतात काय?	नकारार्थी
४	सदर दावा या न्यायालयाचे अधिकार कक्षेत येत नसल्याचे प्रतिवादी शाबित करतात काय?	नकारार्थी
५	प्रस्तुत दावा मुदतीत आहे काय?	होकारार्थी
६	वादी हे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचेकडून रक्कम रु. १०,१६,७५०/— द.सा.द.शे १५ टक्के व दंडव्याज २ टक्के दराने वसूल होउन मिळणेस पात्र आहेत काय?	होकारार्थी
७	काय आदेश आणि निवाडा	अंतिम आदेशानुसार

७. वादीतर्फे सादर केलेल्या साक्षीदाराचे तपशील खालीलप्रमाणे—

अ.क्र	साक्षीदाराचे नाव	निशाणी
१	श्री. दिपक चंद्रकांत निंबाळकर	२२

८. वादीने सादर केलेल्या कागदोपत्री पुराव्याचा तपशील खालीलप्रमाणे—

अ.क्र	कागदपत्रांचे वर्णन	निशाणी
१	साक्षीदाराचे अधिकारपत्र	३२
२	कर्जखाते उतारा	३३
३	कर्ज मागणी अर्ज	२४
४	जामीन कदबा	२७
५	वचनचिठ्ठी	२६
६	फॉर्म के	२३
७	कर्जरोखा	२५
८	नोटीस व पोचपावती	२९—३१

९. वादीतर्फे निशाणी ३५ कडे पुरशीस दाखल करुन पुरावा बंद करणेत आला.

कारणमिमांसा

मुद्दा क्र. १ ते ३ करिता

१०. वादी तर्फे दाव्याचे कथनाचे शाबिती करिता साक्षीदार नं. १ श्री. दिपक

चंद्रकांत निंबाळकर नि. २२ यांचा पुरावा देणेत आला आहे. सदरचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्रात साक्षीदाराने दाव्याचे कथनाची पुनरावृत्ती केली आहे. वादीचे कथनानुसार प्रतिवादी नं. १ यांनी कर्ज मागणी अर्ज देउन वादीकडे रक्कम रु. ५,००,०००/— कर्जाची मागणी केली होती. सदर कर्ज मागणी अर्जाची सत्यप्रत वादीने नि. २४ कडे हजर केली आहे. तसेच नि. ३३ कडे प्रतिवादी नं. १ यांचे कर्ज खातेची उतार्याची प्रत दाखल केली आहे. प्रतिवादी न. १ यांनी त्यांची कैफियत नि. १९ कडे दिली असून त्यामध्ये दाव्यातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी वादी यांचेकडून रक्कम रु. ५,००,०००/— चे कर्ज घेतले नसून वादी यांनी खोट्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रस्तुतचा दावा दाखल केल्याचे कथन त्यांचे कैफियतीमधून केले आहे. परंतु त्याकरिताचा कोणताही कागदोपत्री पुरावा किंवा तोंडी पुरावा प्रतिवादीने सादर केलेला नाही. वादी यांचे तोंडी पुराव्यावरुन तसेच अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्यावरुन प्रतिवादी क्र. १ यांनी कर्ज मागणी केलेचे व सदर मागणी वरुन त्यांना रक्कम रु. ५,००,०००/— मंजूर झालेचे शाबित होत आहे.

११. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे कैफियतीमधून वैकल्पिक विधान मांडलेले आहे. सुरुवातीला कर्जप्रकरण नाकारुन त्यानंतर कर्जाची पूर्ण फेड केल्याचे कथन केलेले आहे. तसेच शेअर्सची रक्कम कर्जखातेमध्ये वर्ग करुन खाते बंद केलेचे देखील कथन केलेले आहे. नि. ३३ कडील कर्जखातेउतार्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांनी रक्कमांचा भरणा करुन कर्जखाते बंद केले असलयाचे दिसून येत नाही. अभिलेखावरील उपलब्ध कागदोपत्री पुराव्यांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. १ यांनी कर्जफेडीमध्ये कसूर केली असलेचे दिसून येते. सबब मी मुद्दा क्र. १ व २ करिता होकारार्थी उत्तर नोंदवून मुद्दा क्र. ३ करिता नकारार्थी उत्तर नोंदवते.

<u>मुद्दा क्र. ४ ते ६ करिता</u>

१२. वादी यांचेकडून नि. ३२ कडे ठरावाची प्रत हजर करुन श्री. दिपक चंद्रकांत निंबाळकर यांना वादी संस्थेने पुरावा देणेचा अधिकार दिलेचे दिसते. त्यानुसार साक्षीदार नं. १ यांनी त्यांचे सरतपासात कथन केले आहे की, वादी संस्थेला प्रतिवादी कडून रक्कम रु. १०,१६,७५०/— येणे बाकी आहे. कर्ज खाते उतार्‍यावरुन कर्ज रक्कमेची परतफेड झाली नसलेचे दिसते. प्रतिवादी नं. १ यांनी दाव्यामध्ये हजर राहून जरी त्यांचा बचाव मांडला असला तरी त्यांचे बचावाचे पुष्टर्थ त्यांनी कोणताही कागदोपत्री अगर तोंडी पुरावा दिला नसलेचे दिसते. अशा परिस्थितीत वादी संस्थेकडे प्रतिवादी क्र. १ यांनी कर्ज रक्कमेची मागणी केली होती हे स्पष्ट दिसून येते. साक्षीदार क्र. १ यांचे कथनानुसार प्रतिवादी १ ते ३ यांना कर्ज मागणी नोटीस पाठवली होती. ती नोटीस मिळाली नाही असा उल्लेख प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे कैफियतीमधून केलेला आहे. परंतु नि. ३१ कडील पोहोचपावतीचे अवलोकन केले असता, वादी यांनी पाठवलेली नोटीस प्रतिवादी क्र. १ यांना मिळाली असलेचे स्पष्टपणे शाबित होत आहे.

१३. प्रतिवादी क्र. १ यांनी सदर दावा या न्यायालयाचे अधिकार कक्षेत येत नसलेचे कथन केलेले आहे. परंतु दाव्याचे कारण या न्यायालयाचे प्रादेशिक हद्दीत येत असल्याने प्रस्तुत दावा चालवण्याचे अधिकार या न्यायालयास आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे कैफियतीमधून सदर दावा मुदतबाह्य असल्याचे देखील कथन केलेले आहे. परंतु अभिलेखावरील पुराव्यांवरुन असे दिसून येते की, प्रस्तुत दावा हा विहित कालावधीत दाखल केलेला असल्याने सदर दावा हा मुदतीत येत असल्याचे शाबित होत आहे.

१४. साक्षीदार क्र. १ यांचे कथनानुसार प्रतिवादी नं. २ व ३ हे प्रतिवादी क्र. १ यांचे कर्जास जामीनदार आहेत. सदर कथनाचे पुष्टर्थ जामीनकदबा व वचनचिठ्ठी इत्यादी कागदपत्राचे प्रत वादीने नि. २७ व २६ सोबत दाखल केलेले आहेत. सदर कागदपत्राचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. २ व ३ हे प्रतिवादी क्र. १ यांनी घेतलेल्या कर्जास जामीन असलेचे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र. १ यांनी घेतलेले कर्ज व्याजासह परत देणेची हमी प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी लिहून दिली असलेचे दिसते. कर्ज मागणी अर्ज अगर वचनचिठ्ठी यावर प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी जामीनदार म्हणून सही केली असलेने ते प्रतिवादी क्र. १ यांचे कर्जास वैयक्तिक व संयुक्तिकरित्या जबाबदार आहे हे शाबीत होते. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी वादीचे सदर कथनांना आव्हानित केले नसलेमुळे त्यांचे विरुध्दचा दाव्यातील मजकूर येथे सिध्द होतो.

१५. वादीचे कथनानुसार प्रतिवादी यांनी कर्ज रक्कमेची परतफेड केली नाही. वर नमुद केले नुसार प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांची कैफियत मांडली असली तरी त्याचे बचावाचे पुष्टर्थ कोणताही पुरावा दिलेला नाही. किंवा वादीचा उलटतपास घ ेतलेला नाही. त्यामुळे वादीचे दाव्यातील कथने विनाआव्हानित राहतात व प्रतिवादी विरुध्द शाबित होतात. प्रतिवादी क्र. १ यांनी कर्जाची परतफेड केले बाबतचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे नि. ३३ कडील खातेउतार्‍यानुसार प्रतिवादी क्र. १ ते ३ हे वादी यांना रक्कम रु. १०,१६,७५०/— देणे लागतात हे शाबित होते. त्या करिता कर्जदार म्हणून प्रतिवादी क्र. १ तसेच जामीनदार म्हणून प्रतिवादी क्र. २ व ३ हे वैयक्तिक व संयुक्तिकरित्या जबाबदार असलेचे सिध्द होते.

१६. वादी यांनी सादर केलेल्या नि. २६ कडील वचनचिठ्ठी नुसार कर्जावरील व्याज दर द.सा.द.शे रक्कम रु. ५,००,०००/— करिता १५ टक्के असलेचे दिसून येते. नि. ३३ कडील खातेउतार्‍यानुसार प्रतिवादी क्र. १ यांचे कर्जखात्यामध्ये रक्कम रु. १०,१६,७५०/— कर्ज खातेमध्ये शिल्लक दिसतात. त्यामुळे रक्कम रु. १०,१६,७५०/— करिता द.सा.द.शे १५ टकके व्याज मंजूर करणे न्यायउचित ठरेल. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ ते ३ हे रक्कम रु. १०,१६,७५०/— यावर दिनांक. १७.०६.२०२३ पासून द.सा.द.शे १५ टक्के व्याज देणे लागतात हे शाबित होते. अभिलेखावरुन तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे आधारे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचेकडून द.सा.द.शे १५ टक्के व्याज दराने थकीत कर्ज रक्कम वसूल करणेबाबतचा अधिकार वादीचा असलेचे शाबित झाले आहे. सबब मी मुद्दा क्र. ४ करिता नकारार्थी व मुद्दा क्र. ५ व ६ करिता होकारार्थी उत्तर नोंदवून मुद्दा क्र. ७ करिता खालील आदेश पारीत करत आहे.

आ दे श

१. दावा अंशत: मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी कर्जाची रक्कम रु. १०,१६,७५०/— (अक्षरी —दहा लाख सोळा हजार सातशे पन्नास रुपये फकत) वैयक्तिक व संयुक्तिकरित्या वादीला परत करावेत.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी थकीत कर्ज रक्कमेवर दिनांक १७.०६.२०२३ पासून द.सा.द.शे १५ टकके व्याजदराने ते रक्कम वसूल होईपर्यंत होणारी रक्कम परत करावी.

४. दाव्याचा खर्च वादी व प्रतिवादी यांनी आपापला सोसावा.

५. येणेप्रमाणे निवाडा करणेत यावा.

खुला न्यायालयात सदर निकाल घोषित करणेत आला.

WAGHAMARE SWAPNALI METHAJI

Digitally signed by WAGHAMARE SWAPNALI METHAJI
Date: 2026.08.05 17:34:29 +0530

ठिकाण — सातारा

दिनांक — ०५.०८.२०२६

श्रीम. एस. एम. वाघमारे
न्यायाधीश
सहकार न्यायालय, सातारा.